<u>जलसंपदा विभागातील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांच्या दिनांक ०१.०१.२००५ अखेरच्या ज्येष्ठतासूचीत सुधारणा करण्याबाबत.</u>

महाराष्ट्र शासन,
जलसंपदा विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक ज्येष्ठता ११११/(२९४/२०११) आ.(तांत्रिक),
मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२ .
दिनांक :- १८.१०.२०११.

<u>परिपत्रकः-</u>

जलसंपदा विभागातील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांची दिनांक ०१.०१.२००५ अखेरची ज्येष्ठतासूची शासन परिपत्रक, जलसंपदा विभाग, क्रमांक ज्येष्ठता १२०६/(१२५/२००६) आ.(तांत्रिक) , दिनांक ३०.०६.२००६ अन्वये प्रसिध्द करण्यात आली होती. सदर ज्येष्ठतासूचीमध्ये काही सुधारणा करण्याबाबतचे प्रस्ताव क्षेत्रिय कार्यालयांकडून प्राप्त झाले होते. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने संबंधित स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांच्या ज्येष्ठतेसंदर्भात सुधारणा करुन त्यांची सुधारित ज्येष्ठतेची नोंद सोबतच्या परिशिष्टात दर्शविल्यानुसार करण्यात येत आहे.

सदर परिशिष्टात नमूद केलेल्या सुधारित नोंदीबाबत संबंधितांना कळविण्याची जबाबदारी संबंधित परिमंडळीय अधिकाऱ्यांची राहील, याची नोंद घ्यावी.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१११०१८१५५३३४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(द. अ. शिंदे)
शासनाचे अवर सचिव

प्रत :-

अधीक्षक अभियंता व परिमंडळीय अधिकारी, दक्षता पथक, औरंगाबाद.
अधीक्षक अभियंता व परिमंडळीय अधिकारी, दक्षता पथक, ठाणे.
अधीक्षक अभियंता व परिमंडळीय अधिकारी, कोयना बांधकाम मंडळ, सातारा.
अधीक्षक अभियंता व परिमंडळीय अधिकारी, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना(दरवाजे), नाशिक.
अधीक्षक अभियंता व परिमंडळीय अधिकारी, दक्षता पथक, अमरावती.
अधीक्षक अभियंता व परिमंडळीय अधिकारी, दक्षता पथक, नागपूर.
अधीक्षक अभियंता व संचालक तथा परिमंडळीय अधिकारी, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे.
प्रत :- आ.(तांत्रिक) संग्रहार्थ .

शासन परिपत्रक क्र. ज्येष्ठता-१११११/(२९४/२०११), दि. १८/१०/२०११चे परिशिष्ट			
अ. क्र.	**ज्येष्ठता सूची क्रमांक व कर्मचा-यांचे नांव**	**कार्यालयाचे नाव**	**केलेली सुधारणा**
१	सोलनकर तु.ल.	पासंविसं, पुणे	ज्येष्ठतासूचीत खालीलप्रमाणे नव्याने नोंद घेतली. ज्येष्ठता क्र – १४३० - अ नाव – सोलनकर तु.ल. जन्मदिनांक – ०१/०६/१९५४ जात प्रवर्ग – भ.ज. – क जाती दावा वैधता प्रमाणपत्र – आहे. स्थाअस संवर्गात ज्या पदावरून आले ते पद – तांत्रिक सहायक आस्थापनेचा प्रकार – कार्यव्ययी आस्थापना त्या पदावरील नियुक्तीचा दिनांक – २०/०५/१९८३ स्थाअस पदावरील समावेशनाचा दिनांक - ०१/०१/१९८९ क अ पदाची व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा दिनांक – ०७/०१/२०११ सध्याचे कार्यालय - भीमा कालवा मंडळ, सोलापूर परिमंडळ – पुणे.
२	२६७४ पवार वा. फ.	नाशिक पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे	श्री पवार यांच्या नियुक्तीचा दिनांक ०४/०२/१९८३ रोजी झाली असल्याने नियुक्ती दिनांकात ८/२/१९८३ ऐवजी ४/२/१९८३ असा बदल करण्यात आला.
३	१२५३ शिंदे ना. गं.	पासंविसं, पुणे	आस्थापनाबाबत कार्यव्ययी आस्थापनाऐवजी नियत अस्थायी आस्थापना अशी नोंद घेण्यात आली. परिणामी, ज्येष्ठता क्रमांक १२५३ ऐवजी सुधारीत ज्येष्ठता १०३१-अ येथे निश्चित करण्यात आली.
४	१८३३ मोरे नि. म.	दक्षता पथक, ठाणे.	अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र वैध असल्याची नोंद घेतली.
५	२२१२ विरकर सु. द.	दक्षता पथक, ठाणे.	इतर मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र वैध असल्याची नोंद घेतली.
६	१०८० जंगम म.बा.	दक्षता पथक, ठाणे.	जात प्रवर्गात इ.मा.व अशी सुधारणा केली. जात वैधता प्रमाणपत्राची नोंद घेतली.

७	२३११ सुर्यवंशी पी. के.	दक्षता पथक, अमरावती	जात प्रवर्गात अनुसूचित जमाती ऐवजी खुला अशी नोंद घेतली.
८	४३६ इन्सुलकर धों.ज.	दक्षता पथक, ठाणे.	जात प्रवर्गात अनुसूचित जाती अशी नोंद घेतली आणि अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र वैध असल्याची नोंद घेतली.
९	१५३४ पठाण मु. बा.	दक्षता पथक, औरंगाबाद	नावात मुमताज पठाण बाबामियाँ ऐवजी पठाण मुमताजखाँ बाबामियाँ अशी सुधारणा केली. व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण दिनांकात डिसेंबर १९९३ ऐवजी डिसेंबर १९९१ अशी नोंद घेतली.
